**महाराष्ट्र शासन**

क्रमांक : टिपीबी-४३१९/२०४/नवि-११
नगर विकास विभाग, ४ था मजला,
मंत्रालय, मुंबई -३२.
दिनांक : ०६/११/२०१९.

प्रति,
आयुक्त
बृहन्मुंबई महानगरपालिका.

**विषय** :- बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील विनियम ४(३) अन्वये स्पष्टीकरण.

---

Proposals of widening of Roads as per the provisions of MMC Act, 1888.

**संदर्भ** :- आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र. MCP/४१५८, दिनांक — ०८/०४/२०१९.

महोदय,

संदर्भित पत्राचे कृपया अवलोकन व्हावे.

बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली -२०३४ चे विनियम १९ मधील नोट-१ नुसार सर्व ९ मी. पेक्षा कमी रुंदीचे रस्ते ९ मीटर करावयाची तरतूद आहे. विनियम १३(५) मध्ये रस्ता रुंदीकरणामुळे बाधित होणारे क्षेत्र वगळून आरक्षणाचे क्षेत्र विचारात घ्यावे अशी तरतूद आहे. मात्र विद्यमान सुविधा / निर्देशन यांचे क्षेत्र रस्ता रुंदीकरणाने बाधित झाल्यास बाधित क्षेत्र वगळून विद्यमान सुविधा / निर्देशनाचे क्षेत्र राहील अशी स्पष्टता सदर विनियमामध्ये नसल्याने त्या अनुषंगाने स्पष्टता करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने संदर्भित पत्रान्वये शासनास विनंती केली आहे.

रस्ता रुंदीकरणामुळे ज्याप्रमाणे आरक्षणाचे क्षेत्र कमी झाल्याचे विनियम १३(५) मध्ये विचारात घेण्यात येते. विद्यमान सुविधा / निर्देशनाबाबत सुध्दा तेच तत्व लागु होते. सबब, सदर विनियम १९ मधील नोट-१ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विनियम १३(५) मध्ये आरक्षणाप्रमाणेच विद्यमान सुविधा / निर्देशनाचे रस्ता रुंदीकरणानंतर कमी होणारे क्षेत्र विचारात घेण्याबाबत महापालिकेची विनंती उचित असून त्यानुसार विकास नियंत्रण व प्रोतसाहन नियमावली-२०३४ चे विनियम ४(३) अन्वये खालील स्पष्टीकरण देण्याचे मला आदेश आहेत :-

"बृहन्मुंबई विकास योजना-२०३४ मध्ये दर्शविलेले आरक्षण/ विद्यमान सुविधा (निर्देशन) चे क्षेत्र हे विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम १९ चे नोट -१ नुसार प्रस्तावित रस्ता रुंदीकरणामुळे बाधित होत असेल तर रस्ता रुंदीकरणानंतर ज्याप्रमाणे आरक्षणाचे क्षेत्र विनियम १३(५) च्या तरतूदीनुसार कमी झाल्याचे विचारात घेण्यात येते, त्याप्रमाणे विद्यमान सुविधाचे (निर्देशनाचे) क्षेत्र कमी झाल्याचे विचारात घेण्यात यावे."

**आपला,**

**( निर्मलकुमार पं. चौधरी )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत :- १) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई.
३) निवडनस्ती (नवि-११)